# संत तुकारामांच्या अभंगांचा रचनादृष्ट्या अभ्यास

प्रो.डॉ. पंढरीनाथ ना. धोंडगे
मराठी विभाग, ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर जि.परभणी.

'अभंग प्रसिद्ध तुकयाचा' असे ज्या संताविषयी म्हटले जाते त्या 'अभंगकार' संत तुकाराम यांच्या अभंगांचा अनेक अभ्यासकांनी वेगवेगळ्या अंगांनी अभ्यास केला आहे. अनेक संशोधकांनी संत तुकारामांच्या अभंगांचे वेगवेगळ्या दृष्टिकोनातून संशोधन केले आहे. अभ्यासकांचा हा अभ्यास आणि संशोधकांचे हे संशोधन असेच अविरत चालू राहणार आहे, एवढे संत तुकारामांचे अभंग रचनेच्या आणि आशयाभिव्यक्तीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण तथा अभ्यासनीय आहेत. संत तुकारामांचे अभंग आशयाच्या दृष्टीने कसे आहेत? त्यापेक्षा रचनेच्या दृष्टीने ते कसे आहेत? हे मी प्रस्तुत शोधनिबंधात सांगणार आहे.

संत तुकारामांच्या अभंगांचा रचनादृष्ट्या अभ्यास करताना पुरुषोत्तम मंगेश लाड यांनी संपादीत केलेली व मुंबई सरकारने इ.स. १९५५ मध्ये प्रकाशित केलेली 'श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा' हा ग्रंथ मी आधाराला घेतला आहे.

प्रस्तुत अभंगगाथेत संत तुकारामांचे एकूण ४६०७ अभंग आहेत. यातील प्रत्येक अभंगाच्या शेवटी अभंगकर्त्याची नाममुद्रा आहे. सदर अभंगगाथेत तुकारामांच्या अभंगांचे दीर्घ म्हणजे 'देवद्वार' अभंग व लघु म्हणजे 'देवीवर' अभंग हे दोन प्रमुख प्रकार पहावयास मिळतात. त्यात पुन्हा 'देवद्वार' अभंगाचे दोन तर 'देवीवर' अभंगाचे तीन उपप्रकार आढळून येतात. ही उदाहरणे पुढीलप्रमाणे लक्षात घेता येतील.

**'देवद्वार' अभंगाचा पहिला प्रकार:**

या प्रकारात दुसऱ्या आणि तिसऱ्या चरणाच्या शेवटी यमक साधलेले असते. यात सहा-सहा अक्षरांचे तीन चरण आणि चौथे चरण चार अक्षरांचे असते.

एक उदाहरण-

साधकाची दशा। उदास असावी।
उपाधी नसावी। अंतर्बाही॥ १॥
॥ध्रु.॥ लोलुपता काय। निद्रेतें जिणावें।
भोजन करावें। परमित ॥घ॥ एकांतीं लोकांतीं। स्त्रियांशी वचन।
प्राण गेल्या जाण। बोलों नये ॥२॥
संग सज्जनाचा। उच्चार नामाचा।
घोष कीर्तनाचा। अहर्निशीं ॥३॥
तुका म्हणे ऐशा। साधनीं जो राहे।
तो चि ज्ञान लाहे। गुरुकृपा॥४॥ (१)

'देवद्वार' अभंगाचा दुसरा प्रकार:

या प्रकारात अभंगाच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्या चरणांमध्ये यमक असते. चरणांमधील अक्षर संख्या ६+६+६+४ अशी असते

एक उदाहरण-

पंढरीची वारी । आहे माझे घरी ।
आणीक न करीं । तीर्थव्रत ॥१॥ व्रत एकादशी ।करीन उपवासी ।
गाइन अहर्नीशीं । मुखी नाम ॥२॥
नाम विठोबाचें । घेईन मी वाचे ।
बीज कल्पांतीचें । तुका म्हणे ॥३॥ (अभंग क्र.२३५१)

'देवीवर' अभंगाचा पहिला प्रकार:

या प्रकारच्या अभंगातील प्रत्येक चरणामध्ये आठ-आठ इतकी अक्षरे असतात. दोन्ही चरणाच्या शेवटी यमक साधलेले असते. या प्रकाराचे समरचना आणि अर्धसमरचना असे दोन भाग प्रा. रा.श्री.जोग यांनी मानले आहेत. अभंगाच्या दोन्ही चरणांत अष्टाक्षरी रचना असली की, तो 'समचरणी' अभंग समजला जातो.

एक उदाहरण-
रुची रुची घेऊं गोडी ।
प्रेमसुखे जाली जोडी ॥१॥ ॥धृ.॥ काळा जाऊं नेदूं वायां ।
चिंतू विठोबाच्या पायां ॥घ॥
करू भजन भोजन । धणी घेऊं नारायण ॥२॥
तुका म्हणे जीव धाला । होय तुझ्यानें विठ्ठला ॥३॥ (अभंग क्र.१३८३)

अभंगाच्या पहिल्या चरणात सहा आणि दुसऱ्या चरणामध्ये आठ अक्षरे आल्यास तो अभंग 'अर्धसमचरणी' ठरतो. या प्रकारच्या अभंगात दोन्ही चरणात यमक साधले जाते. उदाहरणार्थ-'भावे गावें गीत । शुद्ध करूनिया चित्त ॥१॥ (अभंग क्र. २४३९)

'देवीवर' अभंगाचा दुसरा प्रकार:

या प्रकारच्या अभंगात एक आणि तीन हे चरण अष्टाक्षरी तर दोन आणि चार हे चरण सप्ताक्षरी असतात.

एक उदाहरण-
'तरीं भलें वांयां गेलों । जन्मा आलों मागुता।
म्हणूनि ठेलो दास । सावकास निर्भयें (अभंग क्र. ३६६८)

'देवीवर' अभंगाचा तिसरा प्रकार:

या प्रकारच्या अभंगात आठ-आठ अक्षरे असलेले चार चरण असतात. या चार चरणांपैकी पहिल्या तीन चरणांच्या शेवटी यमक असते.

एक उदाहरण-
'राम जानकीजीवन । योगियांचे निजध्यान ।
राम राजीव लोचन ।
तुका चरण वंदितो ॥ ४॥ (अभंग क्र.११०८)

तुकारामांच्या अभंगांचा अभ्यास केला असता त्यांच्या सर्वच अभंगांची चरणसंख्या एकसारखी नाही, हे लक्षात येते. त्यामुळे लघुचरणी आणि दीर्घचरणी असा एक भेद आढळतो. अभंगांतील कडव्यांच्या बाबतीतही समानता नाही. त्यात पुन्हा ध्रुवपदाची रचना वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रस्तुत संशोधनासाठी प्रमाणभूत मानलेल्या वरील अभंगगाथेतील अनेक अभंगांत अभंगाचे ध्रुवपद कोठून सुरू होते आणि ते कोठे संपते ? याचे विशिष्ट चिन्ह दर्शविले आहे. म्हणजे '॥ ध्रु ॥' ही

ध्रुवपद सुरू होण्याची तर '॥घ॥' ही ध्रुवपद संपल्याची खूण दाखविली आहे. यामुळे अशा अभंगांमध्ये संख्येच्या दृष्टीने एका कडव्याचा घोळ जाणवतो.

एक उदाहरण-

सुंदर तें ध्यान उभें विटेवरी। कर कटावरी ठेवूनियां॥१॥ तुळसीहार गळां कासे पीतांबर।
आवडे निरंतर तें चि रूप ॥घ॥
मकरकुंडलें तळपती श्रवणीं।
कंठी कौस्तुभमणि विराजित ॥२॥
तुका म्हणे माझें हेंचि सर्व सुख।
पाहीन श्रीमुख आवडीनें ॥३ ॥ (अभंग क्र.२)

चार कडव्यांच्या या अभंगात सुरुवातीच्या दोन चरणांचें एक कडवे संपले की, '॥१॥' असा कडव्याचा क्रमांक दिला आहे. आणि एक क्रमांकानंतर ध्रुवपद सुरू होत असल्याची '॥ध्रु॥' अशी खुण दर्शविली आहे. पण दुसऱ्या क्रमांकाचे कडवे संपल्यानंतर '॥२॥' असा क्रमांक न टाकता ध्रुवपद संपल्याची '॥घ॥' अशी खुण दाखविली आहे. त्यानंतर तिसरे कडवे संपल्यानंतर '॥२॥' आणि चौथे कडवे संपल्यानंतर '॥३॥' अशी खुण दाखविण्यात आली आहे. त्यामुळे हा अभंग ३ कडव्यांचा मानायचा की, ४ कडव्यांचा ? असा प्रश्न पडतो. मग हा अभंग ध्रुवपदाचे कडवे सोडून ३ कडव्यांचा आणि ध्रुवपदाचे कडवे धरून ४ कडव्यांचा, असे समजावे लागते. मात्र ध्रुवपदाचा उल्लेख नसलेल्या अभंगांतील कडव्यांच्या संख्येबाबत असा घोळ राहत नाही अथवा प्रश्न पडत नाही.

एक उदाहरण-

देव मजुर देव मजुर। नाहीं उजूर सेवेपुढें॥१॥ देव गांढ्याळ देव गांढ्याळ। देखोनिया बळ लपतसे ॥२॥
देव तर काई देव तर काई। तुका म्हणे राई तरी मोठी ॥३॥ (अभंग क्र.१८६३).

या अभंगात प्रत्येक कडवे संपले की, क्रमाने कडव्यांना क्रमांक टाकले आहेत. अशा अभंगांतील कडव्यांच्या संख्येबाबत प्रश्नच शिल्लक राहत नाही. कडव्यांच्या दृष्टीने विचार करू जाता तुकारामांच्या अभंगगाथेत कमीत कमी १ पासून ते जास्तीत जास्त १०१ कडव्यापर्यंतचे अभंग आढळतात. १०१,१००,३५ कडव्यांचा प्रत्येकी एक अभंग आहे. तर ३० कडव्यांचे ४ अभंग आहेत. याशिवाय २८,२४,२२,२१,२०,१८,
१७,१६,१५,१४,१३,१२,
११,१०,९,८,७,६,५,४,३ आणि २ कडव्यांचे अभंग आहेत. यात ३ व ४ कडव्यांच्या अभंगांची संख्या सर्वाधिक आहे.

तुकारामांनी आपल्या अभंगांमध्ये योजिलेले ध्रुवपद हे वैशिष्ट्यपूर्ण आहे. साधारणपणे त्यांच्या अभंगांतील दुसरे कडवे हे ध्रुवपद असते. परंतु हा काही काटेकोर नियम नाही. म्हणजे क्वचित अभंगात पहिले आणि तिसरे कडवे सुद्धा ध्रुवपद असल्याचे आढळते. एक मात्र खरे की, ध्रुवपदामुळेअभंग गाणाऱ्याला सोयीचे जाते. याबाबत भालचंद्र नेमाडे यांचा "धृपदामुळेलयींची आवर्तनेही अभंग गाणाऱ्याच्या हाताशी असतातच"(२), हा अभिप्राय समर्थनीय असा वाटतो.

डॉ. दिलीप धोंडगे यांनी गायक आणि ध्रुवपद यांच्यातील सलगी दर्शवून ध्रुपदाचे महत्त्व विशद केले आहे. ते लिहितात-"ध्रुवपद हे अभंगप्रबंधाचे वैशिष्ट्य आहे. ते गायनाचे व अर्थाचेही एकक आहे. गायनात साथीदारांकडून ध्रुवपद (धृपद) धरले जाते व त्याची आवृत्तीही होते. प्रबंधरचनेच्या दृष्टीने ध्रुवपद हे उपमेय व दार्ष्टांतिकासारखे असते. अभंगाचा मुख्य भाग अगर सूत्र ध्रुवपदात असते"(३). डॉ. धोंडगे यांच्या या लेखनावरून अभंगातील ध्रुवपद आणि गाणाऱ्याची सलगी आपल्या लक्षात यावी.

अभंग-एक छंद:

अभंग हा एक खास मराठी छंद आहे. याच अर्थाने त्याचा फार पूर्वीपासून वापर होत आलेला आहे. सर्वसाधारणपणे ज्या छंदात भंग नाहीत तो अभंग, असे समजले जाते. भंग म्हणजे कर्णमधूर गण होत. सर्वसामान्यांत लोकप्रिय पावलेला हा आद्य देशी छंद प्राचीन काळापासून ते आजपर्यंतच्या बहु तांश कवींनी आपल्या रचनेसाठी स्वीकारलेला आहे. यास संतकवी तुकारामही अपवाद नाहीत. यास डॉ. दिलीप धोंडगे यांच्या "तुकारामांनी आपली सारी रचना अभंग या छंदातच केली आहे"(४), या अभिप्रायावरून अधिकच पुष्टी मिळते.

तुकारामांच्या अभंगांत स्वरांची संख्या जास्त दिसते. अ, आ, इ, ई, उ, ऊ, ए, ऐ, ओ, औ,अं हे स्वर त्यांच्या अभंगात आढळतात. त्यांच्या अभंगात स्वरावृत्ती व व्यंजनावृत्तीचे प्रमाण बरेच आहे. त्यांच्या अभंगांचा वाक्यरचनेच्या दृष्टीने विचार केला असता असे दिसते की, त्यांची वाक्यरचना ही वाक्यधर्माचे पालन करणारी आहे. शिवाय वर्णन करण्यासाठी ती उपयोगी पडणारी आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुकारामांचा अभंग आटोपशीर आहे. मात्र तो असा असला तरी तुकारामांनी आपल्या अभंगाच्या लांबी-रुंदीबद्दल व त्यातील चरण आणि कडव्यांच्या संख्येबद्दल फारशी कदर बाळगलेली नाही, हे स्पष्टपणे दिसते. मात्र तरीही त्यांचा अभंग आवश्यक त्या ठिकाणी संपून त्याला स्वयंपूर्णता आलेली असते, हे मात्र तेवढेच खरे! यासंदर्भात वा.ल.कुळकर्णी यांनी नोंदवलेले "तुकोबांची अभंगरचना ऐसपैस आहे. अभंगांच्या लांबी रुंदी बद्दल, त्यांतील चरणसंख्येबद्दल तुकोबा फारशी कदर बाळगताना कधीच दिसत नाहीत"(५), हे मत लक्षात घेण्यासारखे आहे.

अशा प्रकारे संत तुकारामांच्या अभंगरचनेचे स्वरूप असून त्यातून परमार्थ आणि जीवनव्यवहार यांच्यातील सखोल अनुभूती प्रकट होते. या अभंगरचनेच्या आविष्कारात उत्कट जिव्हाळा आणि भेदकता आहे. या अभंगरचनेतील उपमाने-प्रतिमाने सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनातील असतात. तर सुभाषिते, म्हणी, दृष्टांत परिचयाचे असतात. त्यामुळे ते सर्वसामान्यांच्या हृदयाला जाऊन भिडतात.

अभंगरचनेतील काव्यात्मकता, कथात्मकता, संवादात्मकता, व्यक्तिचित्रणे ही उत्कृष्ट असून ती मनाला भावतात. या अभंगरचनेतील तुकारामांचे डोळस समाजचिंतन आणि सूक्ष्म समाजनिरीक्षण विचार करायला लावणारे असेच आहे. थोडक्यात, वैशिष्ट्यपूर्ण आणि वैविध्यपूर्ण असलेली तुकारामांची ही अभंगरचना म्हणजे तुकारामांची जीवनगाथाच आहे.

संदर्भसूची:

१) श्री तुकारामबावांच्या अभंगांची गाथा, संपा. पुरुषोत्तम मंगेश लाड, गव्हर्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई, इ.स.१९५५, अभंग क्र.२८४६, पृ. ४७७
२) तुकाराम, भालचंद्र नेमाडे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, पृ. ९२
३) शैलीमीमांसा, डॉ. दिलीप धोंडगे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पृ. १०२
४) शैलीमीमांसा, डॉ. दिलीप धोंडगे, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर,पृ. ४८
५) मराठी कविता जुनी आणि नवी, वा.ल. कुळकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. ४४